Vol - VI Issue - III MARCH 2019 Peer Review e-Journal Impact Factor 5.707 ISSN 2349-638x

# जगत्गुरू तुकोबांची अभंगवाणी

**डॉ. अलका गायकवाड**
मराठी विभाग प्रमुख,
भारतीय महाविद्यालय, अमरावती

**सारांश :**

*महाराष्ट्रातील वारकरी संत परंपरेमध्ये संत तुकारामांना मानाचे स्थान आहे. तुकारामांच्या काळी समाजावर धर्मव्यवस्थेचा प्रचंड पगडा होता. कर्मकांडाची जळमट समाजव्यवस्थेला घेरून होती. अनितीचे स्तोम माजले होते. जातीपातीच्या नावाखाली माणसाचे माणसाकडून शोषण सुरू होते. तुकारामाच्या संवेदनशील मनाला या सर्व गोष्टी अस्वस्थ करीत होत्या. अध:पतनाकडे चाललेल्या समाजाला सन्मार्ग दाखविण्यासाठी तुकोबाची काव्यगंगा प्रगटली आहे. आजच्या समाजालाही त्यांचे अभंग दिशादर्शक ठरु शकतात.*

**प्रस्तावना :**

महाराष्ट्राला संतांची थोर परंपरा लाभली आहे. या परंपरेतील मुकुटमणी शोभावा असा अलौकिक संत म्हणजे जगत्गुरु तुकोबा ! भागवत धर्माच्या मंदिराचा कळस म्हणून त्यांचा उचित गौरव केला जातो. तुकारामाच्या अभंगगाथेने आजही जनमाणसाचे ह्रदय सिंहासन काबीज केलेले आहे. समाजाच्या आणि संस्कृतीच्या सर्व क्षेत्रांना स्पर्श करणारे अभंग लिहिणे, ही साधी सोपी गोष्ट नव्हे. परंतु जीवनाचे एकही क्षेत्र असे नाही; ज्यावर तुकोबाने भाष्य केले नाही अवघ्या बेचाळीस वर्षाच्या आयुष्यात आत्मशोध व जीवनशोध घेऊन कालातीत अशा अभंगाची रचना करणे तुकोबाला कसे साधले असेल याविशयी आश्चर्यच वाटते.

एखादा डेरेदार, सर्वांगाने बहरलेला, सर्व शक्ती एकवटून आकाशाकडे झेपावणारा वृक्ष पाहताच; त्या वृक्षाची पाळंमुळं जीवनरसाच्या शोधात जमिनीच्या अगदी खोलवर पोहचलेली आहेत, हे आपल्या पटकन लक्षात येते. मूळं खोलवर गेलेल्या वृक्षाला उन्मळून पडण्याची भीतीही नसते. तुकोबांच्या अभंगांबाबत नेमकेपणाने हेच सांगता येईल.

तुकारामाची अभंगवाणी तुमच्या माझ्या जगण्याला बळ देणारी आहे; चैतन्याची प्रचिती देणारी आहे. जीवनाविषयीच्या सखोल चिंतनातून आपसूक वर आलेली आहे, चिंतनगर्भ आहे, त्यात कृत्रिमता नाही, त्यांना ती सजवावी, नटवावी लागली नाही. वरपांगी नसल्यामुळे काळाच्या पडदयाआड लुप्त होण्याचे भयही तिला नाही. त्यामुळे सतराव्या शतकातील माणसांशी तिने जो संवाद साधला, तितक्याच समर्थपणे आणि आत्मविश्वासाने ती एकविसाव्या शतकातील माणसाशी बोलते आहे, भविष्यातही बोलत राहणार आहे. आजही प्रत्येकाला तुकोबा आपल्याशी बोलताहेत असे वाटते; हे त्यांच्या अभंगाचे बलस्थान आहे. या सखोल जीवनचिंतनामुळे त्यांच्या अनेक अभंगांना सुभाषितांचा, सुविचारांचा दर्जाही प्राप्त झाला आहे.

जीवनसन्मुख राहून विचार मांडल्यामुळे तुकोबांच्या अभंगांना शाश्वत मूल्य प्राप्त झालेले आहे. त्यांच्या अभंगांच्या केंद्रस्थानी मानवी जीवन आहे. जोपर्यंत हे जीवन प्रवाहित होत राहील तोपर्यंत जीवनाला दिशा देणाऱ्या तुकोबांच्या अभंगांना पर्याय राहणार नाही. मानवजात जिवंत राहील तोपर्यंत तुकारामांचे अभंग, अभंगच राहतील, यात शंका नाही.

या संदर्भात डॉ. किशोर सानप असे लिहितात, ''तुकोबांची कविता लोकांच्या दैनंदिन जगण्याशी निगडित आहे. इतर कोणत्याही कवीच्या वाणीचा इतक्या विलक्षण प्रमाणावर प्रभाव असल्याचेही आढळत नाही. आपल्या चिदवादी संस्कृतीत तुकोबा संत असले तरी त्यांनी मानवांच्या अमूर्त आध्यात्मिक आकांक्षा आणि दैनंदिन जीवन यात मोठा समन्वय घडवून आणला आहे म्हणूनच तुकोबांच्या कवितेतून लोकांना आत्मसाक्षात्काराची प्रक्रियाही अनुभवता येते. माणसाला अस्वस्थ करणाऱ्या, टोचण्याचा पर्याय म्हणून तुकोबांची कविता लोकांना प्रेरणादायी असते.''[1] तर निर्मलकुमार फडकुले तुकोबांच्या अभंगवाणीविषयी असे म्हणतात की, ''तुकोबांची अभंगवाणी म्हणजे भक्तिभावनेची

चंद्रभागा आहे. तिनं केवळ पंढरीच्या विठ्ठलालाच प्रदक्षिणा घातली असं नव्हे तर सामान्य माणसाच्या, शेतकऱ्याच्या, कष्टकऱ्याच्या माणुसकीला जाग आणण्याचा प्रयत्न केला. तुकोबांची कविता रंजल्यागांजल्यांना आपुलकीनं पोटाशी धरते. या काव्यात प्रेम, भक्ती, समाजसुधारणेचा विचार, सुखदुःखाचा विवेक, दांभिकता आणि अन्याय यांच्यावर प्रहार आणि देवत्वाला वंदन असे अनेक रंग आणि गंध आढळतात. एका प्रतिभावंतानं श्रेष्ठ मूल्यांची मनःपूर्वक केलेली पूजा म्हणजे ही कविता आहे.''[2]

जीवनाची अस्सल अनुभूती हा तुकोबांच्या अभंगाचा गाभा आहे. त्यामुळे तुकोबांचे जीवन आणि त्यांचे अभंग परस्परांपासून वेगळे करता येत नाहीत. त्यांच्या जीवनाचेच निखळ प्रतिबिंब त्यांच्या अभंगामध्ये प्रतिबिंबित झालेले आहे. आयुष्यात जो जीवनसंघर्ष त्यांनी केला, पचवला त्यातून त्यांचे तत्त्वज्ञान प्रकट झालेले आहे. त्यामुळे ते केवळ शाब्दिक नाही. त्यांच्या प्रत्येक अभंगाच्या मागे त्यांचा धगधगता जीवन संघर्ष उभा आहे. वेदना पचवून कमावलेले सारतत्त्व आहे. हा संघर्ष दोन पातळीवरचा आहे. एकीकडे कुटुंब, समाज, धर्मव्यवस्था यांच्याशी सामना, तर दुसरीकडे अंतःकरणातील षडरिपूंशी सामना.

*'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग '*
*अंतर्बाह्य जग आणि मन ''*

तुकोबांचा हा अभंग म्हणजे या संघर्षातून तावून–सुलाखून निघालेल्या मनाचा शब्दरूप आविष्कार आहे. हा संघर्ष सर्वसामान्य माणसाला आजही जीवनप्रेरणा देतो; म्हणूनच त्यांच्या अभंगाचे मोल कवी मधुकर केचे यांच्या आधुनिक अभंगातून व्यक्त होते.

*'जेव्हा कळले संतांच्या वेदनेचा वेद झाला*
*माझा जात्यातला जीव पीठ होऊनी हासला'*

सर्वसामान्य माणसाच्या प्रत्येक वेदनेचा वेद होत नसतो. कारण ती वेदना पचवून त्याच्या पलीकडे जाण्यासाठी लागणारे बळ किंवा शक्ती त्याच्याजवळ नसते. तुकोबांकडे असे सामर्थ्य असल्यामुळे त्यांचा अभंग जीवन जाणिवेचा हुंकारच ठरतो.

तुकारामाच्या एकूणच व्यक्तिमत्त्वामध्ये एक विलक्षण द्रष्टेपण दडलेले असल्यामुळे काळाच्या पलीकडे पाहू शकणारी व्यापक विधायक दृष्टी त्यांना लाभलेली होती. सर्वसामान्य माणूस काळाच्या परिघातच गुरफटलेला असतो ; परंतु तुकारामांनी परिघाबाहेर दृष्टी टाकली, म्हणूनच कालातीत अशा अभंगाची रचना ते करू शकले.

लोकजागृती करणे हा त्यांच्या अभंगाचा मूळ उद्देश आहे. त्यांची अभंग निर्मिती 'स्वान्तःसुखाय नसून परजनहिताय' आहे. त्याचप्रमाणे 'बुडती हे जन देखवे डोळा', अशी 'कळकळ'; 'उजळावया आलो वाटा खरा खोटा निवाडा' अशी जाणीव; आणि 'बोलिलो जे काही तुमचिया हिता वचन नेणता क्षमा कीजे'।। असा नम्र भाव आहे शिवाय तुकारामांनी समाजप्रबोधनाची व लोककल्याणाची आपली भूमिका आयुष्याच्या अंतापर्यंत सोडली नाही. एकीकडे ही आत्मनिष्ठा आणि दुसरीकडे मनाची बहिर्मुखता असं दुहेरी व्यक्तिमत्त्व त्यांच्या अभंगामागे उभे आहे.

महात्मा फुलेंच्या मते, लेखन हा पोट जाळण्याचा किंवा मनोरंजनाचा वेळकाढू उद्योग नसतो; तर तो समाजातल्या प्रत्येक माणसाला सुखशांतीमय समृद्ध जीवनाकडे नेणारा सत्यमय ज्ञानव्यवहार असतो. या कसोटीला तुकारामाचे लेखन पुरेपूर उतरते. शिवाय असे लेखन वाचकांना अंतर्मुख करते, विचारप्रवण बनविते त्याचे आत्मभान आणि संवेदना जागृत करते.

*'नका घालूं दूध जयामध्यें सार ।*
*ताकाचे उपकार तरी करा।*
*नेदा तरी हें हो नका देऊं अन्न ।*
*फुकाचे जीवन तरी पाजा' ।।*

अशासारखे तुकोबाचे अभंग वाचले की, आपण अस्वस्थ होतो. माणूस म्हणून आपल्या संवेदना चाचपून बघणे आपल्याला भाग पडते. एकांतात का होईना पण स्वतःच्या स्वार्थीपणाची चीड निर्माण होते.

तुकारामाने त्याकाळातील परिस्थितीचे, समस्येचे केवळ चित्रण घडविले नाही; तर समस्येची नेमकी मूळं शोधून त्यावर प्रहार करीत उपायही सुचविले. उदा. मानवी वृत्तीप्रवृत्तीमधला अहंकार हा मानवाचा मोठा शत्रू आहे हे हेरून, अहंकारावरील अचूक औषध म्हणजे भक्ती होय हेही ते सांगतात. भक्तीच माणसाला 'मी–मी' आणि 'मीच का'? या रिंगणातून बाहेर काढू शकते, म्हणून तुकाराम कर्मकांडावर, बाहय उपाचारावर जेवढया प्रखरपणे प्रहार करतात, तेवढाच आंतरिक शुद्धीसाठी आवश्यक असलेल्या निखळ, निःस्वाथी भक्तीमार्गाचाही पुरस्कार

करतात. भक्ती कोणाची करावी? का करावी? कशी करावी हेही ते सांगतात.

लोकहितार्थ तुकोबाची काव्यगंगा प्रकट झालेली आहे. पारलौकिक प्रश्नांपेक्षा माणूस म्हणून माणूस कसा जगेल हा प्रश्न तुकोबांना महत्त्वाचा वाटतो. त्यामुळे त्यांची अभंगगाभा प्ररणागाथा ठरते. यशस्वी जीवनाचे सूत्र विशद करणारी, जीवनाचा मंगलमंत्र देणारी ठरते. माणूस घडविण्याची प्रचंड शक्ती प्रदान करते. त्यांच्या अभंगाची ही ताकद

*'गाढवाचे घोडे । आम्ही करू दृष्टीपुढे*
*चघळी वाहणा । माघारीया बांडा खुणा*
*सोंग संपादनी । तरी करू शुद्ध वाणी*
*तुका म्हणे खळ । करू समयी निर्मळ'*

या अभंगात खुद्द तुकारामांनी स्पष्ट केली आहे.

सतराव्या शतकातील मानव, मानवी जीवन, त्या काळची परिस्थिती यावर भाष्य करीत त्या निमित्ताने जी शाश्वत मूल्ये तुकोबांनी अधोरेखित केली, ती कालातील श्रेष्ठ आणि चिरंतन आहेत. आजच्या एकविसाच्या शतकाची वाटचाली सुकर करणारी आहेत. आज एकीकडे जग जवळ येत आहे, माणसापासून माणूस आज दुरावत चालला आहे. आप–पर भाव वाढीस लागला आहे. माणूस 'स्व'केंद्री बनत चालला आहे. कुटुंबाची खुराडी बनलेली आहेत. ही अतिशय गंभीर बाब आहे. मात्र 'स्व' चा शोध घेणाऱ्याला आणि 'स्व' च्या कोषाबाहेर पडू पाहणाऱ्या माणसाला हे अभंग दिशादर्शक ठरू शकतात.

वेगाने बदलणारे जग, असत् विचारांचे प्रदूषण; अनीतीचा अंधकार जीवघेणी स्पर्धा, वातावरणात भरून राहिलेली उदासिनता, अस्वस्थता, वाढता चंगळवाद, भोगवाद, हिंसाचार, भ्रष्टाचार, अंधश्रद्धा, बुवाबाजी, असमानता, पर्यावरणाचा ऱ्हास या दुष्ट चक्रातून बाहेर पडण्याचा खात्रीचा इलाज म्हणून या अभंगाकडे पाहता येईल. तुकारामाचे अभंग नीतिमूल्यांचा मोलाचा खजिना आहे. अवगुण सोडून सदगुणांची कास धरा, दुर्जनांची संगत सोडून सज्जनांनी संगत करा, अहिंसा सोडून निर्वैर होऊन शांतीचा मार्ग धरा, अंधश्रद्धा सोडून श्रद्धा बाळगा, आळस सोडून प्रयत्नांची पराकाष्ठा करा, बेसावधपणापेक्षा सावध राहा, भौतिक सुखापेक्षा समाधान मिळविण्याचा प्रयत्न करा ही तुकोबांची शिकवण आणि सदुपदेशच आजच्या बिकट परिस्थितीतून आपल्याला वाचवू शकेल हेच तुकोबांच्या अभंगांचे सामर्थ्य आहे.

**निष्कर्ष :**

1. जीवनसन्मुख राहून विचार मांडल्यामुळे तुकोबांच्या अभंगांना शाश्वत मूल्य लाभले आहे.
2. जीवनाची अस्सल अनुभूती ही तुकोबांच्या अभंगांचा गाभा आहे.
3. सखोल जीवनचिंतनामुळे त्यांच्या अनेक अभंगांना सुभाषितांचा व सुविचारांचा दर्जा प्राप्त झाला आहे.
4. लोकजागृतीसाठी तुकोबांची अभंगगंगा प्रकट झाली आहे.
5. कोणत्याही काळातील माणसाच्या जगण्याला आधार देणारी आणि त्याला अंधःकारातून प्रकाशाकडे वाटचाल करायला लावेल, अशी तुकोबांची अभंगवाणी आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

1. डा. किशोर सानप; समग्र तुकाराम दर्शन, विजय प्रकाशन, नागपूर, प्र.आ. 1 मे 2008.
1. डॉ. निर्मलकुमार फडकुले, संत तुकारामांचा जीवनविचार, सुविद्या प्रकाशन, सोलापूर, च. आ. 2013.
2. गं. बा. सरदार – संत वाङ्‌मयाची सामाजिक फलश्रुती, लोकवाङ्‌मयगृह, मुंबई, चाथी आवृत्ती 1982.
3. सदानंद मोरे – तुकाराम दर्शन, गाज प्रकाशन, अहमदनगर, प्र.आ. 1996.
4. डॉ. निर्मलकुमार फडकुले – प्रबोधनातील पाऊलखुणा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्र.आ. 1997.